वसई विरार शहर महानगरपालिका

दि.२६/०८/२०२५

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरे करावे तसेच त्यांच्यामार्फत आयोजित करण्यात येणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम व विविध उपक्रम याबाबत त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी दरवर्षीप्रमाणे यावर्षीही महानगरपालिकेमार्फत 'पर्यावरणपूरक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रम, पर्यावरणपूरक सजावट, सामाजिक उपक्रमांनुसार मंडळांना गुणांकन देण्यात येणार आहे. ही स्पर्धा एकूण १०० गुणांची असणार आहे.

सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी वसई-विरार शहर महापालिकेची मंडप परवानगी घेतलेल्या मंडळांना या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. स्पर्धेचा अर्ज पालिकेच्या सर्व प्रभाग समिती

कार्यालयांत तसेच महापालिकेच्या vvcmc.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २८ ऑगस्ट असून अपूर्ण अर्ज रद्द ठरवण्यात येणार आहेत. गणेशोत्सवात पालिका प्रभाग कार्यालय परीक्षण समिती सदस्य सहभागी मंडळांच्या उत्सवस्थळाला भेट देतील. २८ ते ०६ सप्टेंबर या कालावधीत परीक्षण करून गुणांकन करतील. स्पर्धेच्या प्रथम विजेत्या मंडळाला ₹.२५,००१/-,द्वितीय विजेत्यांना ₹.१५,००१/- , तृतीय क्रमांकास ₹.१०,००१/-चे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. उत्तेजनार्थ १० मंडळांना प्रत्येकी ₹.१००१/- चे पारितोषिक देण्यात येणार आहे.

तरी गणेशोत्सव मंडळांनी स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन महानगरपालिकेमार्फ़त करण्यात आले आहे.

# परिशिष्ट "अ"

## वसई विरार शहर महानगरपालिका पर्यावरण पूरक सार्वजनिक गणेशउत्सव मंडळ पुरस्कार स्पर्धा २०२५
## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने भरावयाचा अर्ज.

| | | |
|---|---|---|
| प्रभाग समिती कार्यालयाचे नाव | :- | |
| सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे नाव | :- | |
| सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पदाधिकारी नाव आणि मोबाइल नं | :- | |
| पत्र व्यवहार पत्ता | :- | |
| उत्सव स्थळ पत्ता | :- | |
| वसई विरार शहर महानगरपालिका परवानगी जावक क्रं व दिनांक | :- | |
| गणेशोत्सव मंडळ स्थापना वर्ष | :- | |
| सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे बँक खाते क्रमांक आयएफएससी कोड नंबर व पॅनकार्ड क्रं. | :- | |

| स्पर्धेच्या गुणांकासाठी आवश्यक माहिती | | |
|---|---|---|
| अ.क्रं | बाब | होय किंवा नाही व तपशील देण्यात यावा (आवश्यक त्या परिपूर्ण कागदपत्रांसह) |
| १. | <u>कलांचे जतन व सर्वधन :</u><br>गायन, वादन, नृत्य, नाट्य, दशावतार, पोवाडा, लावणी, झाडीपट्टी, खडिगम्मत, वहिगायन, चित्रकला, चित्रपट, शिल्पकला, मूर्तीकला इ. विविध कलांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धांचे आयोजन, लुप्त होणाऱ्या कलांचे विविध माध्यमांतून संवर्धन इ. उपक्रम. | |
| २. | <u>संस्कृतीचे जतन संवर्धन :</u><br>दुर्मिळ नाणी, शस्त्र, भांडी इ. विषयक प्रदर्शने, कवी संमेलन, पुस्तक मेळा, अभिवाचन, वक्तृत्व, निबंध लेखन स्पर्धा इ. साहित्य विषयक उपक्रम, लुप्त होणाऱ्या कलाविष्कारांचे संवर्धन, पारंपरिक व देशी खेळांच्या स्पर्धा मंडळाचे व संस्थांचे ग्रथालय.इ.उपक्रम. | |
| ३. | <u>निसर्गाचे व सार्वजनिक संपत्तीचे जतन व संवर्धन :</u><br>वने, निसर्ग, गडकिल्ले, राष्ट्रीय व राज्य स्मारक यांचे जतन संवर्धन, जनजागृती, स्वच्छता, पर्यटन व सामाजिक आर्थिक सक्षमीकरणासाठी केलेले जनजागृतीपर कार्य, व संवर्धन कार्य इ. | |
| ४. | <u>सामाजिक कार्य :</u><br>महिला- जेष्ठ नागरिक – वंचित घटक, दिव्यांग अशा विविध समाजघटकांसाठी आयोजित केलेले उपक्रम.<br>शासनाने राबविलेल्या विविध लोकोपयोगी योजना, संकल्पानांवर | |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| | आधारित उपक्रमाशी संबधित कार्य, उदा. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव इ. आधुनिक तंत्रज्ञान, गाव दत्तक योजना, आरोग्य , शिक्षण, क्रिडा, कृषी, विज्ञान, समाज सुधारणा विषयक उपक्रम, अंधश्रध्दा व अनिष्ट रुढी परंपरा चालीरीती यावर प्रबोधन करणारे कार्यक्रम व कार्य इ. | |
| ५. | **गणशोत्सव आयोजनातील विधायकता :**<br>पर्यावरणपूरक मूर्ती, मूर्तीची उंची कमीत कमी ६ फुट, पर्यावरणपूरक सजावट व विदयुत रोषणाई, ध्वनी, वायु व जलप्रदूषण विरहित परिसर, उत्सव काळात गणेशभक्तांसाठी देऊ केलेल्या प्राथमिक सुविधा तसेच आयोजनातील शिस्त व परिसरातील कायमस्वरुपी स्वच्छतेविषयी जनजागृती व कार्य, कार्य, गणेशभक्तांसाठी असणाऱ्या सुविधा प्रथमोपचार पेटी, पाणी इ. सुविधा, **"एक गाव एक गणपती"** सारखे विधायक उपक्रम असणारे मंडळ, मंडळाच्या कार्यकारणीत महिलांची संख्या एकूण पदांच्या किमान ३० टक्के असणारे मंडळ इ. विधायकता | |

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे नमूद करण्यात आलेली माहिती ही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या अभिलेखानुसार अचूक व खरे आहे. ही माहिती चूकीची किंवा खोटी आढळल्यास आमच्या मंडळाला स्पर्धेतून बाद केल्यास ते आम्हास मान्य राहील.

**अध्यक्ष / सचिव/कोषाध्यक्ष सही, नाव, मोबाइल नं**

Scanned with CamScanner